निर्भीड विचारांचे खुले व्यासपीठ

# निर्भीड NEWS विचार

RNI NO.MAH/MAR/2014/55604

NEWS

E -Paper -www.nirbhidvichar.com
Youtube - nirbhidvichar
Email -sairang.shirpur@gmail.com
Mob- +91 9673706200
+91 7083211500

बातमीला सत्याचा आधार ! निर्भीड विचार !



मुख्य संपादक

महेंद्रसिंह पी.जाधव (राजपुत) शॉप.नं.४ वरचा माळा,कन्या शाळेजवळ,मेन रोड,शिरपुर जि.धुळे (महाराष्ट्र) ४२५४०५



## युनिव्हर्सल हुमन राइट कौन्सिल भारत मुंबई टीम व अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एक हात मदतीचा... मास्क व पाणी वाटप...!

मुंबई -आज दिनांक २६/०४/२०२१ रोजी युनिव्हर्सल हुमन राइट कौन्सिल भारत मुंबई टीम व अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई पोलीस कमिशनर* *श्री हेमंत नगराळे सर* यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुंबई मधील उन्हातान्हात उभे राहून नाकाबंदी साठी व लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी आपले कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस बांधवांसाठी त्यांच्या कर्तव्यावर असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांना मोफत पाणी व मास्क वाटप करण्यात आले.सादर कार्यक्रमास सुरुवात सकाळी ११.३० पासून दादर टी. टी सर्कल येथून करण्यात आली. *१)चित्रा टॉकीज येथे नाकाबंदी वर असलेल्या पोलीस अधिकारी व शिपाई यांना पाणी वाटप करण्यात आले, २)लालबाग गणेश गल्ली येथे पाणी वाटप करण्यात आले, ३)तेजुकाया मेंशन,४) हिरामणी मार्केट पोलीस बीट, ५)काळाचौकी पोलीस ठाणे, ६)नागपाडा वाहतूक पोलीस चौकी,भायखळा* या सर्व ठिकाणा वरील जवळ जवळ १५० ते २०० पोलीस अधिकारी व शिपाई यांना मोफत पाणी,मास्क वाटप करण्यात आले. पोलीस दलाकडून *वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गोकुळ सिंग पाटील साहेब ( काळाचौकी पोलीस ठाणे)* यांनी युनिव्हर्सल ह्यूमन राईट कौन्सिल व अक्षरा सामाजिक संस्थेचे आभार मानले.

सदर कार्यक्रमास महाराष्ट्र कार्याध्यक्ष *श्री.जितेंद्र दगडू दादा सकपाळ,मुंबई महासचिव व अक्षरा संस्थेचे अध्यक्ष श्री.अमोल वंजारे, चिंचपोकळी ब्लॉक प्रेसिडेंट सौ.वसुधा वाळूंज, दादर ब्लॉक प्रेसिडेंट श्री सचिन जाईजोडे, संजीव परमार,अंजली भोसले* व इतर कार्यकर्ते उपस्थित होते